# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** तलोडा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0264 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/09/2025 23:13

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 17/09/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/09/2025
**Time From (वेळेपासून):** 16:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 17/09/2025 **Time (वेळ):** 22:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 033
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/09/2025 22:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तळोदा ,तळोदा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): यश संतोश नरभवर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 2004

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | विमल नगर तळोदा,तळोदा,तलोडा,नदुरबार,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | विमल नगर तळोदा,तळोदा,तलोडा,नदुरबार,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7796424807

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.भैरवनाथ शिवाजी मोरे | | | 1. उपकोषागार कार्यालय, तळोदा, तळोदा,तलोडा,नंदुरबार,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनी नोटा | 2,400.00 |



CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,400.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

तळोदा पोलीस स्टेषन
दिनांक

17/09/2025

माझे नाव श्री.यश संतोश नरभवर वय-21 वर्षे, व्यवसाय- शिक्षण, राहणार:- विमल नगर तळोदा ता.तळोदा, जिल्हा -नंदुरबार मोबाईल नंबर 7796424807

समक्ष हजर होऊन फिर्याद देतो की, मी वरिल ठिकाणी माझी आई वंदनाबाई संतोश नरभवर, बहिण मोहिनी अशांसह राहतो. माझे वडील संतोश वसंत नरभवर हे एकात्मीक आदीवासी प्रकल्प कार्यालय अतंर्गत शासकीय आश्रमशाळा, कासारे, ता. साक्री जि. धुळे येथे चौकीदार पदावर नेमणुकीस होते. ते सन 2014 मध्ये मयत झाले आहेत. त्यानंतर जागेवर अनुकंपा तत्त्वावर माझी आई वंदनाबाई संतोश नरभवर ही सन 2016 मध्ये कामाठी पदावर शासकीय आश्रमशाळा वारसा जिल्हा धुळे येथे नेमणूकीस होती. त्यानंतर तिची बदली शासकीय आश्रमशाळा सरी ता. अक्कलकुवा येथे झाली व तेथून तिची बदली माहे जुलै 2025 पासुन शासकीय आश्रमशाळा बोरद ता. तळोदा येथे झाली आहे.

माझी आई वंदनाबाई ही शासकीय आश्रमशाळा सरी ता. अक्कलकुवा येथे नेमणुकीस असतांना उपकोषागार कार्यालय, अक्कलकुवा येथे नेमणुकीस असलेले कनिश्ठ लेखापाल श्री. भैरवनाथ मोरे यांनी माझ्या आईचे सन 2024 मध्ये वेतनवाढीचे फरकाचे बिल तयार करुन दिले होते.

माझी आई वंदनाबाई ही शासकीय आश्रमशाळा बोरद ता. तळोदा येथे जुलै 2025 मध्ये हजर झाल्यानंतर शासकीय नियमाप्रमाणे सन 2016 पासुन सन 2025 पावेतो कालावधीचा प्रोत्साहन भत्ता बिल 1,43,250/- रुपये मंजुर होण्याकामी शासकीय आश्रमशाळा बोरद ता. तळोदा येथील मुख्याध्यापक यांनी तयार करुन उपकोषागार कार्यालय, तळोदा येथे पाठविले सदर बिलाची रक्कम माझ्या आईच्या बँक खात्यावर 15 दिवसापुर्वी जमा झाली आहे.

3 ते 4 दिवसापुर्वी लेखापाल श्री.भैरवनाथ मोरे यांनी माझ्या आईला "माझी बदली तळोदा येथे झाली आहे, मी तुमचे प्रोत्साहान भत्ता व आगोदरची इतर बिले तयार केली आहेत. तरी मला भेटा " असा निरोप पाठविला होता.

तळोदा येथे घर बांधकाम करण्यासाठी चोला मंडलम या खाजगी फायनान्स कंपनीकडुन गृहकर्ज घेण्याबाबत आम्ही प्रकरण सादर केले असुन त्या कामी माझ्या आईच्या मागील 6 महिन्यांच्या पगाराच्या स्लिप आवश्यक असल्याने, मी व माझी आई वंदनाबाई असे दोन दिवसांपूर्वी तळोदा उप कोषागार कार्यालयात गेलो असता तेथे कनिश्ठ लेखापाल श्री.भैरवनाथ मोरे हे भेटले. त्यांनी मला सांगितले की, "मी तुझ्या आईचे पुर्वीचे वेतनवाढीचे फरकाचे बिल तयार केले असुन व आता त्यांचे शासकीय आश्रमशाळा बोरद येथुन आलेले प्रोत्साहन भत्त्याचे बिल तपासुन मंजूरीसाठी सहायक लेखाधिकारी साळी साहेबांकडे पाठविले म्हणुन ते लवकर मंजुर झाले आहे. तरी त्यासाठी 1900/- रुपये व 06 महिन्याच्या पगार स्लिप काढून देण्याचे 500/- रुपये असे एकुण 2400/- रुपये फी मला देऊन टाका, असे बोलले होते. आम्ही माहिती घेतली असता लेखापाल श्री. भैरवनाथ मोरे हे माझेकडे



CamScanner

बक्षीस स्वरुपात मागत असलेले 2400/- रुपये ही कोणतीही शासकीय फी नसुन ती लाचच आहे अशी माझी खात्री झाली याबाबत मी माझे आईला सांगितले. त्यावेळी आम्हाला लेखापाल श्री. मोरे यांना कोणत्याही प्रकारची लाचेची रक्कम दयायची इच्छा नसल्याने मी अँन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथे संपर्क केला व तेथील अधिकारी यांना आज दि. 17/09/2025 रोजी तळोदा येथे येवुन लेखापाल श्री. भैरवनाथ मोरे यांच्यावर कारवाई करावी बाबत विनंती केली. त्याप्रमाणे पोलीस उप अधीक्षक श्री. प्रशांत भरते हे आज दिनांक 17/09/2025 रोजी स्टाफ व पंचासह तळोदा येथे आले. त्यावेळी लेखापाल श्री. भैरवनाथ मोरे यांनी माझे आईचे पुर्वीचे तयार केलेले वेतनवाढीचे फरकाचे बिलाचे, आता त्यांचे शासकीय आश्रमशाळा बोरद येथुन आलेले प्रोत्साहन भत्त्याचे 1,43,250/-रुपयाचे बिल तपासुन मंजूरीसाठी पाठविल्याचे व सहा महिन्याच्या पगार स्लिपा काढुन देण्याच्या मोबदल्यात माझेकडून बक्षीस म्हणुन "फि" चे स्वरुपात 2400/- रुपये लाचेची मागणी करीत आहेत असे त्यांना सांगितले तसेच मी आज दिनांक 17/09/2025 रोजी लेखापाल श्री. भैरवनाथ मोरे भेटण्यासाठी जाणार असुन ते माझ्या कडे 2400/- रुपये फि च्या स्वरुपात लाचेची मागणी करण्याची शक्यता आहे, करीता कनिष्ठ लेखापाल श्री. भैरवनाथ मोरे, कोषागार कार्यालय तळोदा यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी. असा आशय असलेली तक्रार पोलीस उप अधीक्षक श्री. प्रषांत भरते यांचेकडे दिली.

माझे तक्रारीचे अनुषंगाने श्री. प्रषांत भरते, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार यांनी दिनांक 17/09/2025 रोजी कनिश्ठ लेखापाल श्री. भैरवनाथ मोरे, कोषागार कार्यलिय तळोदा हे खरोखरच माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करणेकामी मला पंच नं 1, श्री.योगेश देसले व माझी आई वंदनाबाई नरभवर यांचेसह पडताळणी कारवाईकामी आवश्यक त्या सुचना देवून माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझे कडील दुचाकी व पंच श्री.देसले यांच्याकडील दुचाकी वाहनाने मला कनिष्ठ लेखापाल श्री. भैरवनाथ मोरे यांची भेट घेण्याकामी उपकोषागार कार्यालय तळोदा येथे पाठविले असता मी, पंच श्री. योगेष देसले व माझी आई वंदनाबाई नरभवर असे उपकोषागार कार्यालय तळोदा येथे गेलो असता तेथे कनिष्ठ लेखापाल श्री. भैरवनाथ मोरे हे भेटले त्यांनी मला " मागील बिलाचे 1900/- रुपये व पगार स्लिपांचे 500/- रुपये असे एकुण 2400/- रुपये होतात.फिस देऊन टाक " असे सांगुन माझ्याकडे 2400/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना " ठिक आहे. संध्याकाळी येतो " असे म्हणुन पंच क्रमांक 1 श्री. योगेष देसले व माझी आई वंदनाबाई नरभवर यांचेसह सापळा पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो असता त्यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुन त्यांनी लोकसेवक कनिष्ठ लेखापाल श्री. भैरवनाथ मोरे, उपकोषागार कार्यालय तळोदा यांनी माझे आईचे पुर्वीचे वेतनवाढीचे फरकाचे बिल तयार केल्याचे, तिचे शासकीय आश्रमशाळा बोरद येथुन आलेले प्रोत्साहन भत्त्याचे 1,43,250/-रुपयाचे बिल तपासुन काहीएक त्रुटी न काढता पुढे पाठविण्याचे 1900 रु. व पगार स्लिपांचे 500/- रुपये असे एकुण 2400/-रूपये लाचेची रक्कम मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरून पोलीस उप अधीक्षक श्री. प्रषांत भरते व त्यांच्या सोबत असलेल्या सापळा पथकाने लाचेची मागणी पडताळणी पंचनामा करण्यात आला. मी विनंती केल्या प्रमाणे सापळा कारवाई दि. 17/09/2025 रोजी दुपारी 04/30 करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

लोकसेवक कनिष्ठ लेखापाल श्री. भैरवनाथ मोरे, यांनी माझ्याकडे स्पष्ट स्वरुपात लाचेची मागणी केलेली असल्याने, मागणी केल्या प्रमाणे त्यांना लाच रक्कम देण्यासाठी मी आज दि.17/09/2025 रोजी माझ्या आईच्या वेतनाच्या रकमेतुन बचत केलेले 2400/-रुपये यात 500/-रुपये दराच्या 04 चलनी नोटा व 100/- रुपये दराच्या 04 चलणी नोटा हजर केल्या. सदर नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावुन नोटा माझ्या शर्टच्या खिशात ठेवल्या व व्हाईस रेकॉर्डर माझ्या शर्टाच्या आत असलेल्या बनियनला लावुन ते सुरु माझे दुचाकीवर मला, पंच नं 1 श्री.योगेश देसले व माझी आई वंदनाबाई नरभवर यांचेसह यांचेसह उप कोषागार कार्यालय, तळोदा येथे पाठविले व सापळा आयोजित केला.

आज दिनांक 17/09/2025 रोजी दुपारी 4/30 वाजेच्या सुमारास कनिष्ठ लेखापाल श्री.भैरवनाथ मोरे, नेमणुक उपकोषागार कार्यालय, तळोदा यांनी माझी आई वंदनाबाई संतोश नरभवर हिचे उपस्थितीत यशस्वी सापळा कारवाई दरम्यान माझेकडुन लाचेची रक्कम 2400/-रुपये स्विकारली आहे. सदर बाबत सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला आहे.

तरी, आज दिनांक 17/09/2025 रोजी लोकसेवक कनिष्ठ लेखापाल श्री.भैरवनाथ मोरे, नेमणुक उपकोषागार कार्यालय, तळोदा यांनी माझे आईचे पुर्वीचे वेतनवाढीचे फरकाचे बिल तयार केल्याचे, आता तिचे



CamScanner

शासकीय आश्रमशाळा बोरद येथुन आलेले प्रोत्साहन भत्याचे 1,43,250/-रुपयाचे बिल तपासुन मंजूरीकरीता सहाय्यक लेखा अधिकारी श्री. साळी, उप कोषागार कार्यालय, तळोदा यांचेकडे पाठविले व मागील 06 महिन्यांच्या पगार स्लिप काढुन दिल्याचे मोबदल्यात बक्षीस म्हणुन लाचेची रक्कम मागणी करुन त्यांचे सार्वजनिक कर्तव्य अनुचितपणे, अप्रामाणिकपणे करून स्वतःच्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन स्वतःचा सांपत्तीक फायदा करुन घेण्याचे हेतुने भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वतःसाठी अन्य पारितोषण मिळावे म्हणून माझेकडे 2400/- रुपये बक्षीस म्हणुन फि च्या स्वरुपात लाचेची मागणी करून नमुद लाचेची रक्कम 2400/- रुपये आज दिनांक 17/09/2025 रोजी दुपारी 4/30 वाजेच्या सुमारास तळोदा येथील उपकोशागार कार्यालयात माझेकडुन स्विकारली म्हणुन माझी लोकसेवक कनिष्ठ लेखापाल श्री.भैरवनाथ शिवाजी मोरे, नेमणुक उप कोषागार कार्यालय तळोदा जिल्हा नंदुरबार यांच्या विरूध्द फिर्याद आहे.

समक्ष

हि फिर्याद दिली सही
दि. 17/09/2025

(प्रषांत चिमणराव भरते)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुपत प्रतिबंधक विभाग,नंदुरबार

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

raju bhagwat lokhande(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



CamScanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)**

पोलीस ठाणे अंमलदार
नवापूर पोलीस स्टेशन
जि.नंदुरबार

**Name (नाव):** raju bhagwat lokhar
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 9823992024



CamScanner